


समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

# परळी संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in

9881265102


संपादक - मोहन व्हावळे



बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 192 | रविवार दि. 27 जुलै 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

# आता शरद पवारांनीच सूत्र हातात घेतली; वादग्रस्त कोकाटेंचा राजीनामा निश्चित?





वादग्रस्त कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची विरोधकांकडून आग्रही मागणी होत आहे. छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी केली होती. त्यावर कोकाटे यांच्याबाबत मंगळवारी निर्णय घेण्यात येईल असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. याशिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली दौऱ्यात भाजप पक्षश्रेष्ठींच्या भेटी घेतल्या. यातही कोकाटे यांच्याबद्दल चर्चा झाली असल्याची माहिती आहे.अशातच आता खुद्द राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख आणि ज्येष्ठ नेते शरद पवार हेही मैदानात उतरले आहेत. शरद पवार एक ते दोन दिवसांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती आहे. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडून ख्रिश्चन समाजाविषयी घेतली जाणारी वादग्रस्त भूमिका, विधिमंडळात झालेली हाणामारी, माणिकराव कोकाटेंचा राजीनामा अशा विषयांवर ही भेट असल्याचे सांगण्यात येते.नुकतेच आमदार जितेंद्र आव्हाड यांचे समर्थक आणि विधिमंडळात मारहाण झालेले नितीन देशमुख यांनी शरद पवार यांची भेट घेतली होती. या भेटीत गोपीचंद पडळकर यांचे संबंधित ऋषिकेश टकले आणि देशमुख यांच्यात काय घडलं याची माहिती देण्यात आली होती. याशिवाय रोहित पवार यांनीही मागील काही दिवसात कोकाटे यांच्याबद्दल पान 3 वर

# पिक विमा महागला

## भातासाठी 457 रुपये, तर नाचणीसाठी 100 रुपये प्रती हेक्टरी हप्ता भरावा लागणार



रायगड जिल्ह्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे.

अवकाळी पाऊस आणि हवामानातील बदलामुळे पिकांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन शासनाने हवामान आधारित पिक विमा योजना सुरु केली. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर

अलिबाग– विधानसभा निवडणूकीनंतर राज्य सरकारने 1 रुपयांतील पिक विमा योजना बंद केली आहे. आता पिक विम्यासाठी शेतकऱ्यांना जादा हप्त्यांची रक्कम भरावी लागणार आहे. भातासाठी 457 रुपये प्रती हेक्टर तर नाचणी पिकासाठी 100 रुपये प्रती हेक्टर हप्ता भरावा लागणार आहे. गेल्या वर्षी 1 रुपयात पिक विमा उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र विधानसभा निवडणूकीनंतर आता एक रुपयात पिक विमा योजना बंद करण्यात आली आहे. त्याऐवजी सुधारित पिक विमा योजना राज्यसरकारने यावर्षीपासून लागू केली आहे.पिक विम्यासाठी पान 3 वर

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांना परळीत उस्फूर्त प्रतिसाद



## रुद्राअभिषेक, महाआरती, बुद्धवंदना, दर्ग्याला चादर, स्वच्छता कर्मचारी महिलांचा सन्मान, शालेय साहित्य, ड्रेस वाटप, गोशाळा येथे चारा वाटप

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथास रुद्राअभिषेक, श्री शनैश्वर मंदिरात महाआरती, बुध्दविहारात बुद्धवंदना, शहावली दर्ग्याला चादर, रुग्णांना फळ वाटप, शहर स्वच्छता कर्मचारी महिलांचा सन्मान, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे ड्रेस वाटप, गोशाळा येथे चारा वाटप आदी सामाजिक कार्यक्रम घेऊन शहर भाजपाने आज ना. पंक koजाताई मुंडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. धुंवाधार पावसात झालेल्या या सर्व कार्यक्रमांना उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध धार्मिक स्थळे, शाळा, महाविद्यालये आणि ठिकठकाणी भरगच्च कार्यक्रम घेण्यात आले.

"माझा वाढदिवस समाजोपयोगी कार्यक्रमांनी साजरा करावा, बॅनर-पोस्टरबाजी करु नये" असे आवाहन पर्यावरण हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शहर भाजपाच्या वतीने शहरात गेल्या पंधरा दिवसापासून "वृक्ष लागवड पंधरवाडा" चालू आहे. तर 21 ते 26 जुलै या दरम्यान सामाजिक सेवा उपक्रम सप्ताह राबविण्यात आला. आज या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले. आज ना. पंकजाताई मुंडे यांना शुभेच्छा देण्यासाठी सकाळी सर्व कार्यकर्त्यांनी बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ रुद्राभिषेक केला. वैद्यनाथ मंदिराच्या जवळच असलेल्या श्री शनेश्वर मंदिर महाआरती करण्यात आली. श्रीराम मंदिर (बालाजी मंदिर) मध्ये असलेल्या अन्नपूर्णा देवीस कुलभूषण जैन यांनी सपत्नीक आरती केली. बंगला गल्ली येथे हुसेन शहावली दर्गा येथे चादर चढवल्यानंतर भीमनगर येथील पान 3 वर

# आज ठळक

## मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर भीषण अपघात! कंटेनरने 20 वाहनांना उडवलं, 4 जणांचा मृत्यू



मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर भीषण अपघात झाला आहे. एका ब्रेक निकामी झालेल्या कंटेनरने 20 वाहनांना धडक दिल्याचे समोर आले आहे. या अपघातात 4 जणांचा मृत्यू झाला असून 15 जण जखनी झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातानंतर एक्सप्रेस वेवर मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. तब्बल 5 किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असल्याची माहिती समोर आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, ब्रेक निकामी झाल्यानंतर कंटेनरने 20 वाहनांना धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, यात तीन वाहने पूर्णपणे चक्काचूर झाली आहे. इतर वाहनांचेही मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात 4 जणांचा जागीच मृत्यू झाला आहे तर जवळपास 15 प्रवासी जखमी झाले आहेत, त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर नेहमीच वाहनांची वर्दळ असते. वीकेंड असल्यामुळे वाहनांची गर्दी आहे. या अपघातामुळे वाहतूक ठप्प झाली आहे, त्यामुळे जवळपास 5 किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रागा लागल्या असल्याची माहिती समोर आली आहे. खोपोलीजवळ नवीन बोगदा आणि फूडमॉल हॉटेल दरम्यान ही घटना घडली आहे.

## आपलं वाटोळं झालंय, हिंजवडीचं आयटी पार्क बंगळुरु- हैदराबादला चाललंय...', अजित पवारांनी सर्वांदेखत सरपंचाला सुनावलं




पुणे: मागील काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार (Ajit Pawar) यांनी हिंजवडीतील सर्व समस्या जाणून घेऊन त्या तातडीने सोडवण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या, त्यानंतर आज पुन्हा एकदा अजित पवार (Ajit Pawar) हिंजवडीत पाहणी दौरा करत आहेत. दोन आठवड्यापूर्वी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांचा पालन करत त्यांनी विकास कामांना सुरुवात केली की नाही याची पाहणी अजित पवार (Ajit Pawar) यांनी सुरु केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशानंतर प्रशासन कामाला लागले आहे. हिंजवडीसह परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून कठोर पावले उचलली जात आहे. दरम्यान अद्यापही या कामांच्या मध्ये काही जण येत असल्याचे अधिकाऱ्यांनी यावेळी अजित पवारांना सांगितले त्यावेळी त्यांनी कामामध्ये येणाऱ्यावर 353 लावा म्हणत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या, तर यावेळी अजित पवारांनी हिंजवडीच्या संरपंचांना देखील खडेबोल सुनावले आहेत.

# सुप्रिया सुळेंसह महाराष्ट्राच्या खासदारांचा दिल्लीत दबदबा, मिळाला मोठा पुरस्कार!



लोकसभेत सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे एकूण 17 खासदारांना संसदरत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यात राष्ट्रवादी (शरद पवार गट) सुप्रिया सुळे, भाजपाचे नेते रवी किशन, निशिकांत दुबे, शिवसेना ( ठाकरे गट) अरविंद सावंत यांच्यासह इतरही खासदारांचा समावेश आहे.लोकसभेतील विशेष योगदानाची दखल घेत, हा पुरस्कार दिला जातो. 16 व्या लोकसभेनंतर सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल हा विशेष पुरस्कार एकूण 17 खासदारांना देण्यात आला. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) नेत्या सुप्रिया सुळे (महाराष्ट्र), शिवसेना नेते श्रीरंग अप्पा बारणे (महाराष्ट्र) भाजपाच्या स्मिता उदय वाघ, शिवसेनेचे नरेश म्हस्के, काँग्रेसच्या वर्षा गायकवाड, भाजपाच्या मेधा पान 3 वर

# जनसेवेसाठी ताई साहेबांना शतायुष लाभो - राजेश गित्ते

## • लोकनेत्या मा.ना.पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून साजरा



परळी - (वार्ताहर) महाराष्ट्र राज्य पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसा निम्मित वाढदिवस- ताई साहेबांचा संकल्प - सामाजिक बांधिलकीचा उपक्रम साजरा करण्यात आला.या अंतर्गत आज दि. 26/07/2025 शनिवार रोजी*श्री सोमेश्वर प्रभुस महाअभिषेक करून ताई साहेब यांना पान 3 वर

# "महाराष्ट्राचे "युथ आयकॉन", नामांकित पत्रकार विलास बडे व्याख्यानास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - नितीन समशेट्टे

## • ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज परळीत तरुणांना मार्गदर्शन





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या रविवार दि. 27 जुलै रोजी परळीत प्रसिद्ध वक्ते, आयबीएन लोकमतचे सहाय्यक संपादक विलास बडे यांचे युवकांसाठी "ग्रामीण तरूणांचे भविष्य: समस्या, संधी आणि संघर्ष" या विषयावर पान 3 वर

# युथ आयकॉन विलास बडे यांच्या व्याख्याननास उपस्थित रहा-निळकंठ चाटे,नरसिंग सिरसाट



परळी (प्रतिनिधी)राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दि. 27 जुलै रोजी परळीत प्रसिद्ध वक्ते,युथ आयकॉन विलास बडे यांच्या व्याखानाचे आयोजन करण्यात आले असुन या व्याखानाला युवक आणि नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजयुमो जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे,भाजपाचे युवानेते नरसिंग सिरसाट यांनी केले आहे.

पत्रकारितेतुन सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे,सामान्य कार्यकर्त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारे युथ आयकॉन पान 3 वर

# परळीसाठी 'ऑक्सिजन बँक'- १५,००० झाडांची घनदाट लागवडीचे ऐतिहासिक पाऊल

## दीपकराव (नाना) देशमुख यांचा स्तुत्य उपक्रम




परळी / प्रतिनिधी प्रदूषणाच्या वाढत्या झळा सहन करणाऱ्या परळी शहरासाठी एक सकारात्मक आणि हरित आशेचा श्वास निर्माण करत, 'ऑक्सिजन बँक' स्थापन करण्याच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आलं आहे.

श्री सप्तश्रृंगी दुर्गा सेवाभावी संस्था संचलित वैजनाथराव मुकुंदराव देशमुख (व्ही.एम.डी.) नर्सिंग कॉलेजच्या परिसरात 15,000 झाडांची घनदाट लागवड (Dense Forest Plantation) करण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला असून, या योजनेचा शुभारंभ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष मा. दीपकराव (नाना) देशमुख यांच्या हस्ते झाला.वृक्षलागवड ही काळाची गरज नसून भावी पिढ्यांसाठी श्वास घेण्याची हमी आहे, असे यावेळी बोलताना दीपकराव देशमुख म्हणाले.उपस्थितीत सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी पान 3 वर

# सामाजिक न्याय खात्याच्या बैठकीवरून जुंपली



महायुती सरकारमधील शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपमधील मंत्र्यांमध्ये वाद निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे. सामाजिक न्याय खात्याचे कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यात बैठकीवरून जुंपली आहे. राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सामाजिक न्याय खात्याच्या काही बैठकांचे आयोजन पान 3 वर

# संपादकीय

## कर्जबुडवे कोण?

शेती हा नेहमीच आपल्या देशात बहुतांश शेतकऱ्यांसाठी आतबट्ट्याचा व्यवहार राहिलेला आहे. पाऊसपाण्याने ओढ दिली, बियाणे खराब निघाले, खत-पुरवठ्याने दगा दिला, अतिउत्पादन होऊन भाव पडले, मागणी असताना सरकारने निर्यातबंदी केली... अशी एक ना दोन कारणे शेतकऱ्याच्या सुखदु:खाचा निर्णय करत असतात. या सगळ्यास तोंड देण्याची त्याची तयारी असते ती फक्त एका आशेवर. आपल्या उत्पादनास रास्त भाव मिळावा. तो त्याचा खरे तर हक्क. उत्पादित मालाचा दर काय असावा हे ठरवण्याचा अधिकार उत्पादकाचा. हा अन्य क्षेत्रांतील किमान न्याय कृषी क्षेत्रास मात्र लागू नाही. या क्षेत्रात उत्पादक सोडून अन्य यंत्रणा उत्पादनाच्या दराबाबत निर्णय घेत असतात. कधी किमान आधारभूत किंमत हे गाजर पुढे केले जाते तर कधी देशांतर्गत बाजारपेठेच्या गरजांचा मुद्दा पुढे येतो. परिणामी शेतकऱ्यास त्याच्या उत्पादनास हवा तो भाव काही मिळत नाही. हे केवळ आणि केवळ चुकीच्या सरकारी धोरणांमुळे होते. तेव्हा त्या पापाची भरपाई करण्यासाठी सरकार अन्य मार्गांनी शेतकऱ्यास चुचकारू पाहते. वीज बिलमाफी, सवलती, खतांवरील अनुदान आणि अखेर कर्जमाफी हे शेतकऱ्यांस आंजारण्या-गोंजारण्याचे हमखास मार्ग. त्यात निवडणुका तोंडावर आल्या असतील तर पाहायलाच नको. बळीराजा'विषयी सरकारचे प्रेम कमालीचे उफाळून येते आणि न मागितलेल्या सवलतींचा वर्षाव केला जातो. अमुक युनिट्सपर्यंत वीज दरमाफी, स्वस्तात खते, पाणीपट्टीत सवलत इत्यादी. आणि निवडणुकीत आव्हान फारच कडवे असेल तर थेट कर्जमाफीचा वादा केला जातो. तो पाळला नाही की काय होते हे 'लोकसत्ता'च्या गुरुवारच्या मुख्य बातमीवरून कळू शकेल. राज्यातील पीक कर्जाची थकबाकी 31,500 कोटी रुपये इतकी प्रचंड वाढल्याचा आणि त्यामुळे अनेक जिल्हा मध्यवर्ती बँका संकटात आल्याचा तपशील यातून समोर येतो. ही बाब महाराष्ट्रास सध्या जे दारिद्र्याचे डोहाळे लागलेले आहेत त्याच्याशी सुसंगत असली तरी तिच्याकडे दुर्लक्ष करून चालणारे नाही.

कारण ही अवदसा स्वनिर्मित आहे. विधानसभा निवडणुकीत काहीही करून सत्तेवर यायचेच या प्रत्येकाच्या आविर्भावामुळे आपणावर नेसूचे सोडून डोक्यास गुंडाळण्याची वेळ आलेली आहे याचेही भान या राजकीय पक्षांस नसते. त्यातूनच शेतकऱ्यांस कर्जमाफीचे आश्वासन दिले गेले. हे लोकानुनयाच्या स्पर्धात्मकतेतून घडते. निवडणुकांपुरती आश्वासनांची खैरात करायची आणि सत्ता आली की त्याकडे पाठ फिरवायची असाही प्रकार अनेकदा होतो. शेतकऱ्यांच्या कृषी कर्जमाफीबाबत तो या वेळी झाला.

माफी वगैरे काहीही नाही; शेतकऱ्यांनी 31 मार्चपर्यंत आपापले हप्ते भरावेत", इतके स्पष्ट विधान अर्थमंत्री अजित पवार करते झाले. पण तरी त्यामुळे काडीचाही फरक पडला नाही. शेतकऱ्यांनी अजितदादांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले. त्यांचेही तसे योग्यच. कारण अर्थमंत्री एका बाजूने मुकाट कर्जाचे हप्ते भरा असे सांगत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस "कर्जमाफीचा निर्णय योग्य वेळी घेतला जाईल" असे म्हणत राहिले. ही योग्य वेळ म्हणजे बहुधा होऊ घातलेल्या जिल्हा परिषदा आदींच्या निवडणुका असावी.

काहीही असो. पण या विसंवादामुळे शेतकऱ्यांनी कर्ज हप्ते भरले नाहीत. परिणामी विद्यमान आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या अखेरपर्यंतही न फेडलेल्या कर्जांची रक्कम 31 हजार 500 कोटींवर गेली. यात लक्षणीय वाटा राज्यातील सहकारी बँकांचा असला तरी राष्ट्रीयीकृत बँकांसही याची मोठी झळ बसल्याचे दिसते. हे असे कर्जाचे हप्ते थकवणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या लाखांच्या घरात आहे.

त्यात त्यांचा दोष काय? त्यांनी ना कर्जमाफी मागितलेली ना त्यांची ती गरज होती. विद्यमान सत्ताधीशांनी उत्साहाच्या भरात ही माफीची घोषणा केली. पण 'लाडक्या बहिणी' आदींवर खर्च केल्यानंतर आता त्यांना साक्षात्कार होत असेल की ही माफी झेपणारी नाही, तर तीकडे डोळा लावून बसलेल्या शेतकऱ्यांनी काय करावे? ही कर्जे लवकरच बुडीत खात्यात जातील. त्यातील अनेकांची ती तशी गेलीही असतील. म्हणजे हे शेतकरी पुन्हा कर्ज घेण्यास बँकांकडे गेल्यास त्यांच्या नावे बुडीत कर्जे असणार. म्हणजे त्यांना नवी कर्जे घेता येणार नाहीत

# चीनचा भारताच्या सार्वभौमत्वावर थेट घाव: CPEC संदर्भात भारताने आक्रमक भूमिका घ्यावी?

**डॉ. भारत कऱ्हाड**

चीन हा केवळ भारताचा व्यापारातील प्रतिस्पर्धी देश नाही, तर तो भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला विविध पातळ्यांवर आव्हान निर्माण करणारा शेजारी देश बनला आहे. विशेषतः चीनने पाकिस्तानसोबत घनिष्ठ आर्थिक, सामरिक व कूटनीतिक संबंध निर्माण करून भारताच्या भू-राजकीय हितसंबंधांना वेढा घालण्याचा प्रयत्न केला आहे. 'चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडोर' (CPEC) हा याच धोरणाचा कळस आहे. ग्वादर बंदर (पाकिस्तान) ते काशगर (चीन) या मार्गावर उभारण्यात आलेला हा आर्थिक महामार्ग पाकिस्तान-व्याप्त काश्मीर (PoK) मधून जातो. हा भूभाग हा भारताचा अविभाज्य भाग असल्याने या प्रकल्पाविरोधात भारताने तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. मात्र, चीनने भारताच्या सार्वभौमत्वाच्या संकल्पनेचा आदर न करता हा प्रकल्प पुढे रेटला आहे, हे अत्यंत गंभीर आणि काळजीचे कारण आहे.

चीन-पाकिस्तान साट्यामुळे दोन्ही देशांच्या संरक्षण, दळणवळण व उद्योग-धंद्यांमध्ये परस्परावलंबन वाढले आहे. CPEC प्रकल्पाअंतर्गत चीनने पाकिस्तानमध्ये रस्ते, वीज प्रकल्प, रेल्वे मार्ग, औद्योगिक वसाहती अशा अनेक पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत. ग्वादर बंदरातील चीनची उपस्थिती ही अरबी समुद्रातील भारताच्या संरक्षणासाठी थेट आव्हान आहे. याचाच अर्थ असा की, चीन आता केवळ लडाख सीमेवरच नव्हे, तर दक्षिणेकडील समुद्रमार्गांवरूनही भारतावर दबाव आणू इच्छितो.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, भारताने केवळ विरोध नोंदवून थांबू नये, तर अधिक आक्रमक आणि स्पष्ट धोरण स्वीकारणे गरजेचे झाले आहे. भारताची सीमारेषा जिथे जिथे चीन व पाकिस्तानच्या सहकार्याचा प्रभाव जाणवतो तिथे सामरिक सज्जता वाढवली पाहिजे. लडाखमधील गालवानच्या संघर्षानंतर भारताने काही महत्त्वाचे पावले उचलली आहेत, जसे की सीमावर्ती भागांत रस्ते, विमानतळ आणि इतर सैनिकी संरचना विकसित करणे. ही गती कायम राखणे आणि अधिक व्यापक स्वरूप देणे ही काळाची गरज आहे.

आक्रमक धोरणाचे अर्थ केवळ युद्धखोरी नाहीत. भारताने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर चीनच्या या कारवायांचा निषेध करण्यासाठी व्यापक राजनैतिक मोहीम हाती घ्यावी. चीनच्या "वन बेल्ट वन रोड" (OBOR) योजनेत CPEC ही एक महत्त्वाची अंगठी आहे. ही योजना भारताच्या सार्वभौमत्वाच्या विरोधात असल्याचे भारताने नेहमीच सांगितले आहे. त्यामुळे OBOR विरोधातील भूमिका अधिक ठाम आणि स्पष्ट ठेवून, भारताने इतर शेजारी देश व आंतरराष्ट्रीय शक्तींना याबाबत एकत्र आणणे आवश्यक आहे.

याबरोबरच भारताने स्वतःच्या शेजारी देशांशी (जसे की नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका, म्यानमार) अधिक सशक्त आणि सहकार्यात्मक संबंध निर्माण करायला हवेत. चीनच्या "चौकटीबद्ध सहाय्य धोरणा" (Debt Trap Diplomacy) विरोधात भारताने 'विकसनाभिमुख सहकार्य धोरण' राबवून विश्वास संपादन करणे आवश्यक आहे. अफगाणिस्तान, मिडल ईस्ट देश आणि आफ्रिकेतील मित्र राष्ट्रांमध्ये भारताची गुंतवणूक व सहभाग वाढवणे हाही एक सामरिक प्रतिसाद ठरू शकतो.

सामरिक क्षेत्रात भारताने 'अक्साई चिन' आणि 'पाकव्याप्त काश्मीर' या मुद्द्यांवर आंतरराष्ट्रीय जनमत तयार करण्यासाठी ठोस प्रयत्न करावेत. या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघ, आंतरराष्ट्रीय न्यायालय, मानवाधिकार संस्था यांच्याकडे अधिकृत तक्रारीसह पुरावे सादर करावेत. केवळ लष्करी सज्जतेवर भर देऊन चालणार नाही, तर भारताने माहिती युद्ध (Information Warfare) व जागतिक जनमताचा प्रभाव या गोष्टींचाही योग्य वापर केला पाहिजे.

या सगळ्या धोरणांना पूरक ठरतील अशा पायाभूत सुविधा भारताने उत्तराखंड, हिमाचल, अरुणाचल व लडाखमध्ये विकसित केल्या पाहिजेत. रेल्वे, रस्ते, हवाईमार्ग, संचार सुविधा यांचा विकास झाल्यास केवळ सैनिकी दृष्टिकोनातून नव्हे, तर आर्थिक प्रगतीदृष्टिकोनातूनही भारताला फायदा होईल. विशेषतः लडाख व जम्मू-काश्मीरमध्ये स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हेही भारताच्या दीर्घकालीन धोरणाचे भाग व्हावे.

आंतरराष्ट्रीय व्यापारात चीनवरील अवलंबित्व कमी करून 'आत्मनिर्भर भारत' धोरणात खरोखरच आत्मनिर्भरतेचा आत्मा यावा यासाठी भारताला धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील. 'मेक इन इंडिया' आणि 'डिजिटल इंडिया' यासारख्या उपक्रमांना प्रत्यक्ष प्रोत्साहन देऊन, भारतीय उद्योगांना बल देणे हे दीर्घकालीन सामरिक साधन बनू शकते. संरक्षण क्षेत्रात 'इंडियन डिफेन्स इंडस्ट्री'ची क्षमता वाढवणे, स्वदेशी शस्त्रास्त्रे व प्रणाली विकसित करणे, आणि चीनशी स्पर्धा करता येईल अशा डिजिटल आणि तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती करणे हेही अनिवार्य ठरणार आहे.

शेवटी, सामरिक आक्रमकता ही केवळ बंदुकीतून प्रकट होत नाही. ती धोरण, राजनय, अर्थकारण, माहिती आणि तंत्रज्ञान या सर्व अंगांनी व्यक्त होते. भारताने याचे भान ठेवून 'शांतता हवी तर सज्जता हवी' या तत्त्वावर आपले धोरण उभे करायला हवे. पाकिस्तानसोबत चीनचे वाढते सख्य आणि त्यातून भारताविरुद्ध निर्माण होणारी सामरिक कुशाग्रता ही एक भुरळ पाडणारी कोंडी आहे. ही कोंडी तोडण्यासाठी भारताने जागतिक व्यासपीठावर कणखर भूमिका घेऊन, संरक्षण, राजनय व विकास यामधील समन्वय साधणारी आक्रमक नीति राबवली पाहिजे. अशा आघाडीवरच भारताची सार्वभौम अखंडता आणि आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा यांचे संरक्षण करता येईल.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

» विनोदी कथा

# सौ. शमीकाचे न झालेले बाळंतपण

**डॉ. दशरथ भोसले**

माझ्या ब्रँचमध्ये नुकतेच श्री. शरद काळे यांचे बदलीने आगमन झाले. काही दिवसांतच या महा बिलंदर माणसाचे रंगढंग लक्षात यायला लागले. दररोज ऑफिसमध्ये आल्या आल्या सर्वांना "गुड मॉर्निंग" करून तो एक एक सोनचाफ्याचे फूल वाटायचा. माझ्या टेबलावर मात्र चार-पाच फुले ठेवायचा. तो जरा स्त्रीलंपट स्वभावाचा असल्यामुळे ब्रँचमधील एका लिपिकेसाठी जरा जास्तच फुले आणायचा, हे आमच्या लक्षात आले होते.

कामाच्या बाबतीत मात्र तो अगदी ढ. पण साहेबांची मर्जी राखण्यात मात्र पटाईत. साहेबांच्या केबिनची बेल वाजली की शिपायाला बाजूला सारून हा पट्ट्या थेट आत घुसायचा. "चहा आण", "पाणी आण", "अमुक व्यक्तीला बोलाव" असे साहेबांचे आदेश असोत, शिपायाचे कामही हाच करायचा. साहेब खूश, म्हणजे आपली रजा पक्की!

आणखी एक विशेष म्हणजे ऑफिसात असताना तो इतरांची वैद्यकीय (मेडिकल) बिले अगदी मनापासून करून द्यायचा. विशेषतः महिला कर्मचाऱ्यांची बिले तर जास्तच तत्परतेने करायचा. गरज भासल्यास स्वतःच्या खर्चाने जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यालयात जाऊन ती बिले पासही करून आणायचा.

आत्ताही काहीसं तसंच घडलं. श्री. शरद काळे एकदम न सांगता रजेवर गेला. शिपायाला घरी पाठवून सांगितलं, "महत्त्वाची कामं खोळंबलीत, ऑफिसला ये." निरोप मात्र असा होता की, "पत्नीची तब्येत बरी नाही, हजर झाल्यावर अर्ज देतो."

गेल्या वर्षीही त्याने दोनदा "पत्नीचं बाळंतपण" हे कारण देऊन रजा घेतली होती. आम्ही एकदा त्याला गंमतीने म्हणालो, "अरे शरद, तुझी दोन मुलं लग्नाच्या वयात आहेत. तुझ्या पत्नीचं वय पन्नाशीच्या पुढे गेलंय. निदान थोडं तरी खरं वाटेल असं कारण दे."

पठ्ठ्याचं उत्तर ठरलेलं, "साहेब, आहे ब्रह्मचारी! मला रजा हवी असली की, साहेबांना गंडवतो. माझं कुणी आई-वडील नाहीत, सासू-सासरे नाहीत. मलाच पत्नीच्या बाळंतपणात सगळं करावं लागतं म्हणालो की, साहेब लगेच रजा मंजूर करतात!"

या दरम्यान अनेक जण स्वतःची मेडिकल बिले करून घेण्यासाठी श्री. शरद काळेला शोधत होते. सहकाऱ्यांनी नाईलाजाने उत्तरं द्यायला सुरुवात केली. त्या गर्दीत श्री. गणेश शिरवणेकरही आला. त्याला ब्रँचमधील एका सहकाऱ्याने खोडसाळपणे सांगितलं, "शरद काळेची पत्नी कालच बाळंत झाली. मुलगा झाला. आजच ती घरी आली आहे. आम्ही सगळे अभिनंदनाला जाणार आहोत."

गंभीरपणे हे घेत श्री. शिरवणेकर तडक शरद काळेच्या घरी गेला. एक मोठा बिस्किटांचा पुडा आणि फळांची टोपली घेऊन.

दार उघडताच सौ. शमिकाने त्याचं स्वागत केलं. पण तेवढ्यातच शिरवणेकर जोरात ओरडला, "अहो वहिनी, कानात कापसाचे बोळे घाला, मफलर बांधा, अंगात स्वेटर घाला, पायात सॉक्स आणि स्लिपर घाला. अशा उघड्यावर अजिबात येऊ नका. काळजी घ्या. आणि आपलं हार्दिक अभिनंदन!"

सौ. शामिका गोंधळली. "कशासाठी अभिनंदन? मला काय झालं आहे?" तिला काही समजेचना.

शिरवणेकर अधिक गडबडला. फळं आणि बिस्किटं तिच्या हातात देऊन तो गडबडलेल्या सुरात म्हणाला, "ब्रँचमध्ये कळलं की, तुम्ही काल बाळंत झाला होतात, मुलगा झाला. म्हणूनच आलो भेटायला!"

आता हसावं की रडावं, याचा निर्णय त्यांनाही घेता येईना.

दुसऱ्या दिवशी श्री. शरद काळे हिरमुसलेल्या चेहऱ्याने ऑफिसला आला. त्याच्या सहकाऱ्याने खवचटपणे विचारलं, "वाह शरद! सौ. शमिका वहिनींनी तुमचं बाळंतपण व्यवस्थित पार पाडलं म्हणे!"

ब्रँचमध्ये एकच हशा उसळला. त्यानंतर श्री. शरद काळेने कधीच "पत्नीचं बाळंतपण" हे कारण रजेसाठी वापरलं नाही!

**डॉ. दशरथ भोसले, विनोदी कथा लेखक, दापोली- जिल्हा रत्नागिरी.**

# रामदास तिडके यांच्या नेतृत्वातना.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवस भोगलवाडीत उत्साहात साजरा

» जि प सर्कल मधिल सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य,फळे वाटप व वृक्षारोपण



धारूर ( बाबुराव तिडके )

लोकनेत्या मंत्री - पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन भोगलवाडी जिल्हा परिषद मधील संपूर्ण गावातील शाळेच्या विद्यार्थ्यांना फळे वाटप शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण दि 28 - वार - सोमवार पासुन सात दिवस हा सामाजिक उपक्रम केला जाणार आहे हा कार्यक्रम भोगलवाडी या ग्रामपंचायतचे गट नेते मा श्री रामदास तिडके यांच्या माध्यामातुन केला जाणार आहे मंत्री - पंकजाताई मुंडे यांना पुढील आयुष्य सुख समाधानी व भरभराटीचे जाओ व ताईंच्या हातुन राज्य सुजलाम - सुफलाम घडुन राज्याचे हित चांगले घडो व ताईंना दिर्घ - आयुष्य अनंत - रुपी लाभो याकरिता या सामाजिक उपक्रम या कार्यक्रमांचे आयोजन केले आहे - रामदास तिडके हे मंत्री पंकजाताई मुंडे यांचे हितचिंतक व कार्यकर्ते आहेत किल्ले धारूर तालुक्याच्या राजकिय पटलावर रामदास तिडके हे एक नावाजलेले मोठे नाव असुन सदैव जनतेच्या संपर्कात व लोकांची कामे करणारा तालुक्याचा नेता म्हणुन रामदास तिडके यांची ख्याती आहे आपल्या लाडक्या नेत्या मंत्री - पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त भोगलवाडी जिल्हा परिषद सर्कल मधील सर्व गावातील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप फळे वाटप व वृक्षारोपण ठेवलेले असल्याने एक चांगला सामाजिक उपक्रम राबवीत असल्याने मा श्री रामदास तिडके यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

# कारगिल युद्धातील अनुभव ऐकून उपस्थित गहिवरले..!

## जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेने केले कारगिल युद्धातील शहिदांना अभिवादन





अंबाजोगाई (प्रतिनिधी) येथील जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेने 26 व्या कारगिल विजय दिवस निमित्त शहिद भारतीय जवानांना अभिवादन केले. संस्था परिसरात युद्ध स्मारक स्तंभावर संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप यांच्या हस्ते रित परेड करण्यात आला. या परेडनंतर कारगिल युद्धामध्ये शहिद झालेल्या वीर सैनिकांना त्यांच्या अतुलनिय कार्याच्या स्मृती जागवत आदरांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप, सचिव माजी सुभेदार आबासाहेब हाके, कोषाध्यक्ष बाबासाहेब केंद्रे, संचालक भरत पांचाळ, संचालक अरविंद तपसे, संचालक ज्ञानेश्वर कदम, संचालक सिंधुताई निर्मळ, सभासद दिलीप निकम, सर्व सन्माननिय सभासद श्री अंकुश काळे, गोपीनाथ काळे, राधाकिशन कुंडगर, शिवाजी गंगणे, पांडुरंग गावडे, यशवंत व्हावळे, संभाजी वाघमारे यांच्यासह यांच्यासह संस्था वसाहती मधील पुरुष व महिला भगिनी यांनी उपस्थित राहून कारगिल विजय दिवस साजरा केला. या प्रसंगी कारगिल युद्धामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या

# सीआरपीएफचे बोधवाक्य- "सेवा आणि निष्ठा!"

➲ (27 जुलै:भारताचे केंद्रीय राखीव पोलीस दल- सीआरपीएफ स्थापना दिन.)

केंद्रीय राखीव पोलीस दल- सीआरपीएफ हे भारतीय पोलीस संस्थेचे एक घटक आहे. हे संघटन भारत सरकारच्या गृहमंत्रालयच्या आदेशानुसार काम करते. यामध्ये काही महत्वाचे कार्य म्हणजे दंगलीच्या ठिकाणी नियंत्रण ठेवणे, काऊंटर मिलिटरी, बंडखोरी, ऑपरेशन, जमाव नियंत्रण, वामपंथी अतिरेक्यांना सामोरे जाणे, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी बचाव आणि मदत कार्य करणे, यास्तव केंद्रीय राखीव पोलीस दलाची स्थापना दि.27 जुलै 1939ला करण्यात आली. ज्ञानवर्धक माहितीकरिता श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदरलेख अभ्यासा... संपादक.

केंद्रीय राखीव पोलीस दल- सेंट्रल रिझर्व्ह पुलिस फोर्स- सीआरपीएफ हे भारतातील सुरक्षा दलांपैकी एक सर्वात मोठे केंद्रीय दल आहे आणि भारतीय पोलीस सेवेतील हे फोर्स एक बहुउद्देशीय असून अनेक क्षेत्रांतील सुरक्षा करते. सीआरपीएफ भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या (एमएचए) अधिकारात कार्यरत आहे, सीआरपीएफची स्थापना 27 जुलै 1939 साली झाली आणि यांचा उद्देश अनेक सुरक्षेच्या कार्यात आंतरिक सुरक्षा प्रदान करणे, सीमावर्ती सुरक्षा आणि आणीबाणीच्या परिस्थितीत सुरक्षा, मदत देणे हा होता तसेच सीआरपीएफ विभिन्न क्षेत्रात तैनात करण्यात आली आहे जसे जम्मू आणि काश्मीर, छत्तीसगढ, प्रभावित क्षेत्र तसेच इतर भारत देशातील राज्यांत देखील ही सुरक्षा देण्यात आली आहे. सीआरपीएफचे बोधवाक्य "सेवा आणि निष्ठा" आहे, भारत देशाच्या स्वातंत्र्यानंतर दि.2 डिसेंबर 1949ला कायदा लागू करण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दल- सीआरपीएफ बनले आणि निवडणूक काळात देखील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाने खूप मोठ्या प्रमाणात सुरक्षेचे कार्य निभावले. भारत देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीआरपीएफचे महत्व मोठे आहे, हे फोर्स एक विशेष सशस्त्र दल आहे जे विविध भागात सुरक्षा आणि शांतता राखण्यात महत्वाची भूमिका बजावते. सीआरपीएफ हे सीमा सुरक्षा, अंतर्गत सुरक्षा, व्यावसायिक घटनांचा तपास आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित कार्यवाहीसाठी आहे. सन 1999च्या साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये देखील लाभलेली मोठ्या प्रमाणात सुरक्षितता बघून आपण या फोर्सचे महत्व समजू शकतो. सीआरपीएफच्या एकूण 246 इतक्या बटालियन आहेत आणि सीआरपीएफ हे भारत देशातील सर्वांत मोठे अर्धसैनिक दल आहे. जर आपण याचा इतिहास बघितला तर मध्य प्रदेश राज्यात निमच मध्ये दोन बटालियनद्वारे स्थापना झालेली होती. सीआरपीएफचा जर आपण इतिहास बघितला तर या फोर्सचा पूर्वीपासूनच मुख्य उद्देश हा होता कि भारत देशातील संवेदनशील राज्यांत असलेले ब्रिटिश रहिवासी यांचे संरक्षण करणे होता. ही पूर्वीपासूनच त्याची प्राथमिकता होती, म्हणून सीआरपीएफ नक्कीच या उद्देशांमुळे संरक्षण अंतर्गत आहे, असे म्हणता येईल. सीआयएसएफ हे एक केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल आहे आणि हे एक केंद्रीय सशस्त्र दल देखील आहे, जर या फोर्सशी तुलनात्मक विचार केला तर हे सीआयएसएफ औदयोगिक क्षेत्रात- खदानी, विमानतळ, मेट्रो स्टेशन, अणुऊर्जा प्रकल्प आणि इतर महत्वाचे सरकारी तसेच खाजगी क्षेत्रांतील सुरक्षा आणि सुविधा देण्याचे काम करते आणि सीआरपीएफचा जर विचार केला तर हे भारत देशातील सर्वांत मोठे केंद्रीय सशस्त्र दलांपैकी एक आहे. या फोर्स कडे- अंतर्गत सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था राखणे, इतर अंतर्गत कारवाया करणे, आपत्तीच्या ठिकाणी तात्काळ सुरक्षा पुरविणे

इत्यादी. दोन्हीही फोर्स कामानुसार विभाजित झालेले आहेत आणि दोन्हींनी फोर्स आपापल्या जागी स्वतःची वेगळी ओळख देऊन आहेत, म्हणून दोन्हीही फोर्सला आपल्या आवडीनुसार आपण प्राधान्य देऊन त्यांची कामे बघून आवड निवडू शकतो. सीआरपीएफ किंवा बीएसएफ कोणते सर्वोत्तम आहे? तर सीआरपीएफच्या कार्याचा विचार आपण मागे केलाच आहे, तर बीएसएफ- सीमा सुरक्षा दल हे भारत देशातील सीमांचे संरक्षण करणारे दल आहे आणि सीमांना संरक्षण देणे, त्याचे प्राथमिक कर्तव्य आहे तसेच- भारत देशाच्या सीमांचे रक्षण करणे, तस्करी, बेकायदेशीर इमिग्रेशन, इतर सीमापार गुन्ह्यांचा प्रतिकार करणे, युद्धाच्या काळात देशात शांतता राखणे, इत्यादी. फोर्सनुसार कामांचे विभाजन झाले आहेत आणि प्रत्येक फोर्स फक्त आपल्या करत असलेल्या कामामुळे विभाजित आहेत.

सीआरपीएफ- सेंट्रल रिझर्व्ह पोलीस फोर्स आणि या फोर्सला भारत देशातील अनेक प्रकारच्या सुरक्षा सोपविण्यात आल्या आहेत. यामध्ये सार्वजनिक लोकांची सुरक्षा राखणे, एखादा कायदा मंजूर झालेला असल्यास त्याची अंमलबजावणी करणे, सीमावर्ती सुरक्षा देणे, त्यानंतर आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षा, मदत प्रदान करणे, सुरक्षेच्या ठिकाणी तपासणी करणे, शांतता राखणे, गुन्ह्यांचा तपास करणे, आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ कार्यवाही करणे, विशेष ऑपेरेशन, आपत्ती निवारण, निवडणुकांमध्ये वाढीव सुरक्षा पुरविणे आणि कार्यक्रमांमध्ये सहायता देणे अशा अनेकविध सरकारी किंवा सामाजिक सुरक्षा, सुविधेचे काम सीआरपीएफ करते.

!! सीआरपीएफ स्थापना दिनानिमित्त संबंधित जवानांचे हार्दिक अभिनंदन जी !!

**- संकलन व सुलेखन -**

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**

**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

**फक्त दूरभाष- 7132796683.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अ‍ॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

आक्रमक भूमिका घेतली आहे. त्याबद्दलही शरद पवार फडणवीस यांच्यासोबत चर्चा करणार असल्याची माहिती आहे.फडणवीस सरकारमधील मंत्र्यांवर संजय राऊत यांनीही टीका केली आहे. फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील 75 टक्के मंत्री युजलेस आहेत, ते मंत्री म्हणून काम करीत नाहीत ते दरोडेखोर म्हणून काम करतात. एक मंत्री मारहाण करतो, एक मंत्री रमी खेळतो, एक सिगारेट ओढत पैशांच्या बॅगा भरतो, एका मंत्री डान्सबार चालवतो, अशी टीका राऊत यांनी केली आहे.

----------------------------------------

शेतकऱ्यांना आता जादा हप्त्याची रक्कम भरावी लागणार आहे. भात पिकासाठी प्रती हेक्टरी 457 रुपये तर नाचणी पिकासाठी प्रती हेक्टरी 100 रुपये विमा योजनेचा हप्ता शेतकऱ्यांना भरावा लागणार आहे. महत्वाची बाब म्हणजे या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना फार्मर आयडी आणि ई पीक पहाणी बंधनकारक असणार आहे. त्यामुळे हप्त्याबरोबर काही अटींची पूर्तता करणे शेतकऱ्यांना बंधनकारक करण्यात आले आहे. अटींची पुर्तता न केल्यास शेतकऱ्यांना पिक योजनेचा लाभ मिळू शकणार नाही. ह्या योजनेत सर्व पिकांसाठी जोखीमस्तर 70 टक्के आहे. विमा संरक्षणा साठी रायगड जिल्ह्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनी या विमा कंपनीची निवड झाली आहे. विमा संरक्षित रक्कम भात पिकासाठी विमा हेक्टरी 61 हजार रुपये इतकी असणार आहे.पिक पेरणीपासून काढणी पर्यंतच्या कालावधीत विविध नैसर्गिक घटक, कीड व रोगांचा प्रादूर्भाव इत्यादी कारणांमुळे पिक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळ साठीच्या उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळ मधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना सम प्रमाणात नुकसान भरपाई अदा केली जाणार आहे.

----------------------------------------

बुद्धविहारात बुद्ध वंदना झाली. उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.*वैद्यनाथ विद्यालयात गणवेश आणि शालेय साहित्य वाटप* ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांतर्गत शहरातील वैद्यनाथ विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना गणवेशाचे आणि शालेय साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष विनोद सामत, बँकेचे संचालक अनिल तांदळे, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, जेष्ठ नेते शेख अब्दुल करीम, महादेव इटके, बाळासाहेब कराळे आदी उपस्थित होते.

दरम्यान ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करण्यात आले.*स्वच्छता कर्मचारी महिलांचा सन्मान* शहरामध्ये स्वच्छतेचे अतिशय महत्वाचे काम करणाऱ्या पण कायम दुर्लक्षीत असलेल्या स्वच्छता दूत म्हणून भूमिका निभावणाऱ्या स्वच्छाता कर्मचारी महिलांचा सन्मान करून ना..पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात वाढदिवस साजरा करण्यात आला. स्वच्छता महिला कर्मचाऱ्यांना सन्मानाने साडी-चोळी दिली. यावेळी पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचेही यावेळी वितरण करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांना भाजपाचे माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद शेठ सामत, भाजपाचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, भाजपाचे जेष्ठ माऊली दादा आघाव, विजय वाकेकर, केशव माळी, संदीप लाहोटी, अनिल तांदळे, डॉक्टर शालिनीताई कराड, बाळासाहेब कराळे, राजेंद्र ओझा, अब्दुल करीम, महादेव इटके, उमेश खाडे, प्रा. पवन मुंडे, मोहन जोशी, अश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, सचिन गीते, अरुण पाठक, विकास हलगे, नरसिंग शिरसाट, पवन मोदानी, प्रशांत कराड, योगेश पांडकर, सुशील हरंगुळे, किशोर केंद्रे, ज्ञानोबा सुरवसे, बंडू नाना कोरे, नितीन समशेट्टी,अच्युत जोगदंड, राहुल घोबाळे, दीपक जगतकर, श्रीपाद शिंदे, राजेश कोलवार, दिलीप नेहरकर, विजयकुमार खोसे, बाळू फुले, उमेश निळे, विजय बुंदुले, शेख अनिस, शेख खदिर, शमी शेख, अनिस कुरेशी, मुंजा फुके, श्रीनिवास राऊत, प्रल्हाद सुरवसे, नरेश पिंपळे, मिलिंद कांबळे, रवी वाघमारे, विराज गीते, अनिश अग्रवाल तसेच महिला आघाडीच्या चंदाताई ठोंबरे, सारिका कुरील, वर्षा जोशी, शैलजा आदोडे

आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

----------------------------------------

कुलकर्णी या खासदारांचा समावेश आहे. भाजप नेते भर्तृहरी महताब (ओडिशा), क्रांतिकारी समाजवादी पक्षाचे नेते एनके प्रेमचंद्रन (केरळ), भाजपाचे प्रवीण पटेल, विद्युत बरन महातो, दिलीप सैकिया यांनाही संसदरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.खासदारांव्यतिरिक्त संसदेच्या दोन प्रभावशाली स्थायी समित्यांचाही सन्मान करण्यात आला. यामध्ये भर्तृहरि महताब यांच्या अध्यक्षतेखालील वित्तविषयक स्थायी समिती आणि डॉ. चरणजीत सिंह चन्नी (कांग्रेस) की यांच्या अध्यक्षतेखालील कृषीविषयक स्थायी समितीचा समावेश आहे. अहवालांची गुणवत्ता, कायद्याच्या दृष्टीने दिलेले योगदान लक्षात घेऊन हा सन्मान करण्यात आला.संसदेत काही खासदार हे आक्रमकपणे सामान्यांचे प्रश्न मांडत असतात. एखादा प्रश्न मांडण्यासाठी काही खासदार तर दिवरात्र एक करून संबंधित प्रश्नाचा अभ्यास करतात. काही खासदारांच्या प्रश्नांमुळे तर सरकारमधील मंत्रीदेखील गोंधळून जातात. अशाच धडाकेबाज आणि महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या खासदारांना संसदरत्न पुरस्कार दिला जातो. जे खासदार लोकांशी निगडित असलेल्या समस्या संसदेत उपस्थित करतात, जनतेचे प्रश्न मांडतात अशा खासदारांच्या कामाची दखल घेऊन हे पुरस्कार दिले जातात. संसदेच्या प्रभावशाली स्थायी समित्यांनाही सन्मानित केलं जातं. संसदरत्न पुरस्काराची सुरुवात 2010 साली प्राईम पॉइंट फाउंडेशनद्वारे करण्यात आली होती.

----------------------------------------

जनसेवेसाठी शतायुष लाभो अशी प्रार्थना करण्यात आली. टोकवडी येथे पशु वैद्यकीय शिबीर घेण्यात आले. सेलू परळी येथे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला तसेच बेलंबा आणि वैजवाडी येथे ही पदाधिकारी यांनी वृक्षारोपण केले . स्वच्छता अभियान अंतर्गत बुद्ध विहार मिरवट, राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर मंदिर दादाहरी वडगांव, सावता महाराज मंदिर लोणी येथे भाजपा पदाधिकारी यांनी स्वच्छता केली.

शैक्षणिक प्रगती अभियान अंतर्गत सोमेश्वर विद्यालय जिरेवडी येथे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.जनसेवा अभियान अंतर्गत वैद्यनाथ मंदिर परिसरातील निराधार व्यक्तींना ब्लँकेट वाटप करण्यात आले.समाजोपयोगी उपक्रम समारोप प्रसंगी बोलताना परळी वैजनाथ भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांनी जनसेवेसाठी ताई साहेब यांना शतायुष लाभो ही प्रभु वैद्यनाथा (पंचम ज्योतिर्लिंग) कडे प्रार्थना केली. तसेच सर्व कार्यक्रम यशस्वी केल्या बद्दल सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे आभार मानले.परळी तालुक्यातील सर्व कार्यक्रमास प्रमुख पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, सरपंच, चेअरमन,बूथ प्रमुख, महिला आघाडी सह सर्व आघाडी, संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेऊन यशस्वी केले.

----------------------------------------

व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानाला युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजपाचे नितीन समशेट्टी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी युवकांना मार्गदर्शन मिळावे यासाठी हा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. रविवार दिनांक 27 जुलै रोजी सकाळी 11 वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे नामांकित पत्रकार विलास बडे यांचे "ग्रामीण तरुणांचे भविष्य: समस्या, संधी आणि संघर्ष" यावर व्याख्यान होणार आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

युवकांसाठी दिशादर्शक आणि प्रेरणा देणाऱ्या या कार्यक्रमाला तरुणांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आवाहन भाजपा नितीन समशेट्टे व सहकाऱ्यांनी केले आहे.

----------------------------------------

विलास बडे यांचे रविवार दिनांक 27 जुलै रोजी सकाळी 11 वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे व्याख्यान होणार आहे.हे व्याख्यान खासकरुन सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची इच्छा असणाऱ्या व सोशल मिडीयात सक्रिय असणाऱ्या युवक युवतींसाठी उपयुक्त असुन या व्याख्यानाचा परळीतील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन भाजयुमो जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे आणि भाजपा युवानेते नरसिंग सिरसाट यांनी केले आहे.

----------------------------------------

श्री भैरवाल आणि वनरक्षक वैजनाथ दौंड यांच्यासह अनेक पर्यावरणप्रेमींचा सहभाग होता. परळी प्रदूषणमुक्त करण्यासाठी सुरु झालेला हा उपक्रम भविष्यात शहराच्या आरोग्यासाठी संजीवनी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

----------------------------------------

केल्यानंतर, संजय शिरसाट यांनी नाराजी व्यक्त करत त्यावर लेखी स्वरुपात हरकत नोंदवली. त्याला प्रत्युत्तर देताना माधुरी मिसाळ यांनी देखील पत्राच्या माध्यमातून उत्तर दिलं आहे. त्या म्हणाल्या की, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसारच मी या बैठकांचे आयोजन केलं आहे. शिवाय, सामाजिक न्याय खात्याच्या राज्यमंत्री म्हणून मला अशा बैठकांसाठी पूर्वपरवानगी घेण्याची गरज नाही," असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. आता यावर संजय शिरसाट यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, माझा उद्देश स्पष्ट होता की, राज्यमंत्री, कॅबिनेटमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री अशा पायऱ्यांवरुन निर्णय प्रक्रिया व्हावी. त्यांनी त्यांचे मत मांडले आहे. निश्चित मुख्यमंत्री कार्यालयाला प्रत्येक गोष्ट विचारली पाहिजे. त्यांनी विचारले असेल तर माझी त्यात काही हरकत नाही. सारखे सारखे पत्र व्यवहार करणे हे माझ्या स्वभावात नाही. मला ज्या काही सूचना करायच्या होत्या, त्या मी केलेल्या आहेत. त्यांनी काय उत्तर द्यायचे ते दिलेले आहे. त्यामुळे कोणता तरी वाद निर्माण झाला आहे, असे समजण्याचे काही कारण नाही, असे त्यांनी म्हटले.

----------------------------------------

## पान 4 वरुन

प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमित्रा भुतडा, माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक तांबडे एस.व्ही, ज्येष्ठ शिक्षक सुधीर मिसाळ, रवी गुळभिले, सुधाकर काळे, राठोड बी. डी, पुंडकरे व्ही. टी., केंद्रे एन. एम, सौ.बनसोडे ए.के, प्रवीण केंद्रे, गजानन कोल्हे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी बोलताना प्रा. पवन मुंडे म्हणाले की, सरस्वती शाळा ही नामांकित असून या शाळेने ना. पंकजाताई मुंडे सारखे नेतृत्व महाराष्ट्राला आणि देशाला दिले आहे. त्यामुळे या शाळेचे वैभव वाढवण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असून येत्या काही काळामध्ये बीड जिल्ह्यात नाही अशी इमारत सरस्वती शाळेची करण्यासाठी आपण नंबर पंकजाताई मुंडे यांच्याकडे प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले."हॅप्पी बर्थ डे... पंकजाताई साहेब..." यावेळी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून उत्सव साजरा केला. अतिशय आकर्षकरित्या सजवलेला केक "हॅप्पी बर्थ डे... पंकजाताई साहेब..." अशा घोषणा देत चिमुरड्यांच्या हाताने कापला. या घोषणांनी ना. पंकजाताई मुंडे यांची शाळा दणाणून गेली होती.

----------------------------------------

सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी युवकांना प्रेरणा मिळावी, चांगले विचार ऐकायला मिळावेत या उद्देशाने हा व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मुलाखत घेण्याची संधीसुद्धा विलास बडे यांना मिळालेली आहे. भल्या भल्या पुढाऱ्यांना घाम फोडणारे आणि सामान्य माणसाला न्याय मिळवून देणारे असे नामांकित पत्रकार व्याख्याते आहेत. अशा या प्रेरणादायी वस्त्याला ऐकण्यासाठी सर्वांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक तथा माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

----------------------------------------

झाल्यास भक्तांची गैरसोय टळेल आणि स्थानिकांनाही आपले दैवत शांततेत व श्रद्धेने पाहता येईल.

----------------------------------------

सप्ताह चालणार असून याचा प्रारंभ मोठ्या उत्साहाने करण्यात आला आहे. पुढे बोलताना भाजपचे नेते संजय आंधळे म्हणाले की, ना. पंकजाताई मुंडे या एक प्रेरणादायी नेतृत्व, संघर्षशील विचारसरणी आणि समाजकार्याच्या भक्कम आधाराचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची हीच प्रेरणा घेऊन वडवणी तालुक्यात त्यांचा वाढदिवस सामाजिक भान जपणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येत आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेली 15 वर्षे सामाजिक बांधिलकी जोपासत विविध सामाजिक उपक्रम राबवले गेले आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून प्लॉस्टिकचा वापर न करता कापडी पिशवीचा वापर करा व बॅनरबाजी करून फटाके फोडुन तसेच हार बुके वापरून पर्यावरणाला धोका होईल.असे न कराता समाजोपयोगी वंचित, उपेक्षित घटक विध्यार्थी यांच्या हितासाठी वाढदिवसचा इतर खर्च टाळून व पर्यावरण पुरक वाढदिवस साजरा करण्याचे आम्ही ठरवले होते. म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करत किमान एका विद्यार्थ्याला एक वर्ष पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य वाटप केले असून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाची रुची निर्माण व्हावी. तसेच प्रत्येक शाळेचा परिसर नैसर्गिक दिसावा, व पर्यावरण संतुलित राहावे व पर्यावरणाच्या अनुषंगाने वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे समाजा बरोबरच निसर्गाचे देखील आपण काही देणे लागतो त्यामुळे निसर्गाचे ऋणानुबंध जपण्यासाठी पर्यावरण जपने हि काळाची गरज आहे असल्याचे मत संजय आंधळे यांनी व्यक्त केले. यावेळी उपनगराध्यक्ष बन्सीधर मुंडे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, शिवसेना तालुकाप्रमुख माऊली गोंडे, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती अनिल चोले, अशोक गोंडे, युवक मोर्चा तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री, डॉ. रोहिदास खोटे, सरपंच खोटे, दत्ता गोंडे, बाबुराव तवरे, शिवाजी गोंडे, गोरख गोंडे, गणेश गोंडे, संतोष शिंदे, सुंदर राठोड, बालासाहेब शिंदे, गंगाधर लोणकर, मधुकर खाडे, राजाभाऊ लोंढे, सुधाकर नागरगोजे, किशोर चाटे, देवानंद तांबडे, शालेय समिती अध्यक्ष, मायकर, अण्णासाहेब शिंदे, शरद राठोड, रामभाऊ लांडे, संतोष खाडे, व आदी भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

----------------------------------------

पंकजाताईच्या वाढदिवसाच्या निमित्त वृक्ष लागवडीचा राबविण्यात आलेला उपक्रम कौतुकस्पद असल्याचे राजेश गित्ते केले. राज्याच्या पर्यावरण, पशुसंवर्धन, वातावरणीय बदल व दुग्धविकास मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त शनिवार, दि. 26 जुलै 2025 रोजी सेलू (परळी वैजनाथ) ग्रामपंचायतचे सौ.शिवकन्या रामचंद्र (बाळू) फड व युवा नेते रामचंद्र (बाळू) फड यांच्या वतीने पर्यावरणाचा संरक्षणचा संदेश देण्यासाठी वृक्षलागवड कार्यमाचे आयोजन करण्यात आले होते. वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते व गावातील नागरिक यांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड करून करण्यात आला. जिल्हा परिषद शाळा परिसरात वृक्षलागवड करण्यात आली. यात गावातील नागरिक व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. विविध प्रकारचे 2000 वृक्षाचे वृक्षारोपण करून निसर्ग विषयी सर्वांना प्रेम निर्माण करण्याच्या दृष्टींने ना. पंकजाताई मुंडे याचा वाढदिवस वृक्ष लागवड करून साजरा करण्यात आला. यावेळी भाजपचे तालुका सरचिटणीस रवि कांदे सर, अनिल गुट्टे, चेअरमन दत्तात्रय गुट्टे माजी सरपंच गंगाधर सातपुते ग्रामपंचायत सदस्य क्रष्णा डापकर व मान्यवर तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

----------------------------------------

जण एकत्र येऊन वेळ काढून प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाऊन मदत करणे हा आहे.

आतापर्यंत अनेक कामे केली , त्यात प्रामुख्याने दुष्काळ ग्रस्तांना मदत, सिंधुताई सपकाळ सप्ताह आयोजित कार्यक्रमात भाग व मदत, दरवर्षी उन्हाळ्यात संकटमोचन हनुमान मंदिर मोंढा मार्केट परळी-वैजनाथ येथे येणाऱ्या पंचक्रोशीतील शेतकरी, व्यापारी आणि भाविकांसाठी पाणपोई ची व्यवस्था, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सभासदांच्या विद्यार्थ्यांचा सत्कार व पुढील शैक्षणिक कार्यात मदत केली जाते. वर्षातून एकदा सात ते आठ दिवस सामुहिक सहलीचे आयोजन करण्यात येत असते. तसेच एक दिवसीय सहलीचे आयोजन केल्या जाते. त्याचाच एक भाग म्हणून 20 जुलाई 2025 रविवार रोजी श्री मन्मथ स्वामी कपीलधार व चाकरवाडी येथील संत श्री माऊली महाराज यांच्या समाधी चे भावपूर्ण आरती सह दर्शन घेतले. सहलीत सहभागी 50 सदस्य झाले होते. त्यात महीला व पुरुष यांनी मनोरंजन करत गाण्यांच्या भेंड्या, हौजी गेम, धार्मिक भजन घेत मनसोक्त आनंद द्विगुणित केला व एका आगळ्या दुनियेत मग्न झाले. अध्यक्ष व सर्व सदस्यांच्या सहकार्यांने ही एकदिवसीय सहल आनंदात पार पडली.

या सहली साठी मन्मथ स्वामी मंदिर ट्रस्ट, कपीलधार चे अध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे यांनी तेथे पोहोचल्यावर दर्शना पासुन ते जेवणाची व कार्यक्रमानंतर, विश्रांतीसाठी हॉल दिला व मदत केली. आपल्या ग्रुप चे अध्यक्ष पांडुरंगजी सोनी यांनी ग्रुप च्या वतीने शब्द सुमनाने त्यांचे आभार व्यक्त केले. सदस्यांनी उपस्थित राहुन सहलीची शोभा वाढली त्या बद्दल अध्यक्षांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. या सहलीत महेश सिनियर सिटीजन ग्रुपचे अध्यक्ष श्री आणि सौ. पांडुरंगजी सोनी, श्री आणि सौ. चैनसुखजी जाजू, श्री आणि सौ.सुभाषजी तोतला, श्री आणि सौ. रामप्रसादजी मोदाणी, श्री आणि सौ. हरिप्रसादजी सारडा, श्री आणि सौ. बैजुलालजी भंडारी, श्री आणि सौ. डॉ. आर.बी. जाजु, श्री आणि सौ. ओमप्रकाशजी सारडा, श्री आणि सौ. जुगलकिशोरजी सारडा, श्री आणि सौ. द्वारकादासजी सारडा, श्री आणि सौ. डॉ. रमेशजी काबरा, श्री आणि सौ. दुर्गाप्रसादजी तापडीया, श्री आणि सौ. रमेशजी काकाणी, श्री आणि सौ. मुरलीधरजी बंग, श्री आणि सौ. महादेवआप्पा फडकरी, श्री आणि सौ. डॉ. एल.डी.लोहीया, श्री आणि सौ. श्रीकांतजी चांडक, श्री आणि सौ. रमेशजी काकाणी, श्री आणि सौ. सुधीरजी बंग, श्री आणि सौ. अशोकजी कांकरिया,

ओमप्रकाशजी भुतडा, बजरंगलालजी चांडक, ओमप्रकाशजी तापडीया, वाडे साहेब, किशोरजी चांडक, पांडुरंगजी मोदाणी, राजेंदजी मालपाणी, विष्णुदास बियाणी, विजयजी मुंदडा, रविंद्रजी राठोड, तिडके साहेब, नागनाथ पारसेवार आदी सदस्यांनी सहभाग घेतला होता. सहलीचे नियोजन अध्यक्ष श्री पांडुरंगजी सोनी, सचिव श्री ओमप्रकाश जी भुतडा, उपाध्यक्ष श्री हरिप्रसादजी सारडा, कोषाध्यक्ष श्री जुगलकिशोरजी सारडा, सहसचिव प्रा. बैजुलालजी भंडारी यांनी व्यवस्थीत केले होते.

----------------------------------------

पशुसाठी लोकउपयोगी पशुरोग उपचार व लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे भाजपा राज्य परिषद सदस्य सतीश मुंडे, सरपंच डॉ.राजाराम मुंडे, भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गीते , ज्येष्ठ नेते भाजपा श्रीराम मुंडे, डॉ. भरत मुंडे, ज्येष्ठ नेते तथा टोकवाडी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सुग्रीव बापू मुंडे यांच्या हस्ते फीत कापून शुभारंभ करण्यात आला. सदरील शिबीरात तज्ञ डॉक्टर म्हणून डॉ.एच.बी. पांडे (सहा.आयुक्त पशुसंवर्धन विभाग, परळी वैजनाथ), डॉ.पी. एल. आघाव (पशुधन विकास अधिकारी, परळी वैजनाथ), डॉ.विठ्ठल मुंडे (पशुधन विकास अधिकारी मांडवा, परळी वैजनाथ), डॉ.श्रीनिवास पाथरकर ( वरिष्ठ अधिकारी, पोहनेर), विशाल पंदीलवाड, ज्ञानेश्वर कहाळे, हरि राऊत, महेश मंदीकर पर्यवेक्षक तर ज्योतिबा मुंडे, कृष्णा फड, गजानन मुंडे, मनोज कांबळे, मुंजा मस्के (सेवादाता, मुख्यमंत्री दूत) हे उपस्थितीत होते. जनावरांवर विविध प्रकारचे उपचार, गर्भ तपासणी, वंध्यत्व निवारण व लसीकरण करण्यात आले. शिबिरामध्ये पशुवैद्यक तज्ज्ञांनी जनावरांची सखोल तपासणी करून आवश्यक औषधोपचार केले तसेच जनावरांच्या आरोग्य व्यवस्थापनावरील मार्गदर्शन दिले. या शिबिरात गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्यातील अजारी पशुची तपासणी व उपचार करण्यात आले. यामध्ये गाई म्हशीतील गर्भ तपासणी, वंधत्व तपासणी व उपचार, घटसर्प, लंम्पी, आंतविषार, रेबीज रोगाचे, राहिलेल्या जनावरांचे लसीकरण, कत्रिम रेतन, जतंनाशक, गोचाड, गोमाशी प्रतिबंध व पशुधन विभागाच्या योजनाची माहिती व मार्गदर्शन केले. भाजप तालुका उपाध्यक्ष संजय मुंडे यांच्या पुढाकारातून आणि पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद बीड व भारतीय जनता पार्टी टोकवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते पंकजाताई हे दूरदृष्टी नेतृत्व आहे. त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही काळाची गरज आहे पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वातून आपल्या भागाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास भाजपा राज्य परिषद सदस्य सतीश मुंडे यांनी सांगितले नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात मात्र मुक्या प्राण्यांसाठी अभिनव अशा पद्धतीने संजय मुंडे यांनी राबविलेले शिबीर फायद्याच ठरवले. या शिबीराचा पशुपलकांना फायदा झाला असल्याचे भाजपा तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांनी सांगितले. डॉ. राजाराम मुंडे यांनी संजय मुंडे यांनी पुढाकार घेऊन राबविलेले शिबीर कौतुकस्पद व अभिनंदन करत त्यांच्या पुढाकाराचे कौतुक केले. डॉ. एच. पांडे म्हणाले, पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अशा सामाजिक उपक्रमांची गरज होती आणि ते पुरेपूर साध्य झाले.तसेच पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा पशुपालकांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. शिबीरामध्ये जनावरांची गर्भधारणा तपासणी, वंधत्व निवारण, आजारी पशुंवर उपचार व लसीकरण इत्यादी पशुसेवा देण्यात आल्या. पशुपालकांना विविध शासकीय योजनांची माहिती या शिबिराच्या माध्यमातून पशुधन विकास अधिकारी डॉ.पी. एल. आघाव यांनी दिली. प्रास्ताविक करतांना भाजप तालुका उपाध्यक्ष संजय मुंडे यांनी सांगितले की, "हे शिबिर मुक्या जनावरांसाठी एक वरदान ठरले आहे. मोठ्या संख्येने पशुपालकांनी सहभाग घेतल्याने जनजागृतीही झाली आहे. यापुढेही असे उपयुक्त उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यावेळी माजी सरपंच रामकिशन नाना काळे, माजी सरपंच मारुती मुंडे गुरुजी, वीट उद्योजक नवनाथ मुंडे, सदाशिव दादा मुंडे,बांबूराव मुंडे, उत्तम काळे, प्रकाश काळे, संतोष मुंडे, लहुदास मुंडे,सुरेश आघाव, वैजेनाथ आघाव,गुणवंत मुंडे, नागनाथ जिवराज मुंडे हे उपस्थितीत होते. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी भाजपा युवा नेते टी. डी. मुंडे, दिलीप भालेराव, अंनत मुंडे, अनिल मुंडे, भास्करराव मुंडे, पिंटू माणिक मुंडे,ग्रामपंचायत सदस्य माणिक मुंडे, ग्रामपंचायत सदस्य तुकाराम मुंडे,हनुमंत मुंडे,युवा उधोजक अर्जुन मुंडे, भागवत मुंडे,रघुनाथ काळे,नामदेव मुंडे, राजाभाऊ शिवाजी मुंडे, रामधन मुंडे, सुरज मुंडे, गणेश गुणवंत मुंडे, श्रीनिवास दादा मुंडे, अभिमान रोडे, नाथराव घाणघावं,मीनानाथ मुंडे, सुकदेव मुंडे, महादेव त्रिंबक मुंडे, राजेश मुंडे, इंद्रजित मुंडे, ऋषिकेश मुंडे,अनिकेत फड,संपत मुंडे यांनी परिश्रम घेतले. या शिबीरस पशुपालकांची व टोकवाडी येथील ग्रामस्थ यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

----------------------------------------

विष्णुपंत शामराव गीते, ग्राम महसूल अधिकारी परळी वैजनाथ, संघटनेचे खजिनदार व कुशल संघटक श्री अर्जुन किशनराव साखरे, श्री व्यंकटराव शिंदे सदस्य श्री भिमराव गायकवाड सदस्य तहसील चे कर्मचारी खाजा पटेल आदी मान्यवर उपस्थित होते., कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. भारत माता की जय,, शहीद जवान अमर रहे अमर रहे, छत्रपती शिवाजी महाराज की जय, आदी, घोषणांनी चौक दणाणून गेला होता. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने होऊन कार्यक्रम संपन्न झाला. तद्रंतर माजी सैनिक संघटना परळी, वैजनाथ यांची त्रैमासिक बैठक संपन्न झाली

----------------------------------------

युवक प्रदेशाध्यक्ष अतुल बांदिले, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे उपाध्यक्ष संजय विभुते, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे सहसचिव सुनील चौधरी, प्रदेश सहसचिव जयेश बागडे, राज्य उपाध्यक्ष निलेश सकपाळ, नांदेड विभागाध्यक्ष मधुकर राऊत, विभागीय सचिव पांडुरंग शिंदे, युवा आघाडी विभागीय अध्यक्ष संजय कळणे, विभागीय कार्याध्यक्ष प्रा काशीनाथ सालमोटे, नागपूर विभागाध्यक्ष जगदीश वैद्य, वर्धा युवा अध्यक्ष सुनील मांगरुडकर, विठ्ठल आप्पा चौधरी, परभणी जिल्हा अध्यक्ष सतिश नगराळे, परभणी सहसचिव रमेश चांदिवाले,श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवा लांडगे, व्यवस्थापक चंद्रकांत उदगीरकर, कोलूघाणा सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष सुरेश लांडगे, उपाध्यक्ष सुर्यकांत व्यवहारे,छगन आप्पा क्षीरसागर यांच्या सह वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी गजानन शेलार यांनी समाजाची ताकत ही संघटनेत असते त्यामुळे पदाधिकाऱ्यांनी संघटना बांधणीचे कार्य हिरीरीने केले पाहिजे. संघटना बांधली असेल तर शासन आपल्या मागण्या पूर्ण करते. तर संजय विभुते यांनी सांगितले की,परळीतील समाजाने एकत्र येवून जिल्हा संघटित केला पाहिजे. जिल्हा संघटित झाल्याशिवाय समाजाची ताकत दिसणार नाही. तर युवा प्रदेशाध्यक्ष अतुल बांदिले यांनी युवकांनी एकत्र येत संघटन मजबूत केले पाहिजे, युवक संघटित झाल्याशिवाय समाजाची ताकत दिसणार नाही. संघटित झाल्याशिवाय आपल्याला सामाजिक, आर्थिक व राजकीय फायदा होणार नाही. म्हणून युवकांनी एकत्र यावे. सुनील चौधरी यांनी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या मागणीला यश आले असून देशात जातीय जनगणना होणार आहे. तेली समाजाच्या विविध मागण्यांसाठी वेळोवेळी आंदोलने करून तेली समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. या कार्यक्रमात परळीसह सिरसाळा, माजलगाव मधील काही पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. कार्यक्रमांचे सुत्रसंचलन व प्रास्ताविक प्रविण फुटके, आभार प्रा मधुकर शिंदे यांनी मानले. या बैठकीस जिल्हा अध्यक्ष संगमेश्वर फुटके, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष राधाताई फकिरे, युवक जिल्हाध्यक्ष संतोष वाघमारे, जिल्हा सचिव प्रा.मधुकर शिंदे, युवक आघाडीचे संभाजीनगर कार्याध्यक्ष अतुल बेंडे, सेवा आघाडी संघटक नितीन चौधरी, सेवा आघाडी कार्याध्यक्ष प्रा गणेश परळीकर सह तालुकाध्यक्ष मोहन राजमाने, शहराध्यक्ष राजकुमार भाग्यवंत व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

----------------------------------------

वर्षांपासून इनरव्हील क्लबच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत असून, यंदा प्रथमच अध्यक्षपदाची जबाबदारी स्विकारली. अध्यक्षपदाचा अनुभव नसतानाही त्यांनी यशस्वीरित्या नेतृत्व करत क्लबचे कार्य उंचावले. त्यांच्या समर्पित कार्यशैलीची अधिवेशनात विशेष दखल घेतली गेली.सन्मानप्रसंगी श्रद्धाताईंनी भावनिक शब्दांत आपली प्रतिक्रिया दिली. "माझ्या कामावर विश्वास ठेवून मला संधी दिलीत, प्रत्येक प्रयत्नाला इतकं सुंदर यश दिलंत यासाठी मी मन:पूर्वक सर्वांची आभारी आहे," असे त्या म्हणाल्यत्यांनी यशाचे श्रेय कुटुंबीयांच्या पाठिंब्याला दिले. "माझे पती नरेश हालगे, मुले रोहन व रोहित हालगे, सून डॉ. कोमल हालगे, नात रेवा यांचे मला पूर्ण पाठबळ मिळाले. माझी मैत्रीण छाया देशमुख यांची साथ आणि पुण्यात आदरणीय आशाताई कापसे यांनी केलेला सत्कार, हे क्षण मी कधीही विसरणार नाही," असे त्यांनी नमूद केले.श्रद्धा हालगे यांचे सासरे वैजनाथ कॉलेजचे माजी अध्यक्ष, नगराध्यक्ष होते, तर भाऊ आमदार आणि अनेक पदांवर कार्यरत होते. माहेर व सासर दोन्ही कुटुंब राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असल्याने समाजसेवेची प्रेरणा त्यांना लाभली.अधिवेशनानंतर त्यांचा सत्कार पानभोसीच्या सरपंच राजेश्री पाटील भोसीकर (जिल्हा नियोजन समिती सदस्य नांदेड), देऊळगावच्या सरपंच सुमित्रा (बहीण) यांनी केला. श्रद्धाताईंनी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले.-

----------------------------------------

साजरा झालेल्या कार्यक्रमाला उप - सरपंच श्री तुकाराम तिडके यांच्या सह - प्रा तेजेसजी तिडके ( सर ) मा जी प सदस्य श्री शिवाजी ( आप्पा ) मुंडे मुख्याध्यापक - अशोक ( भाऊ ) तिडके - महादेव ( नाना ) तिडके ॲ धर्मराज मुंडे नेते - बालाजी तिडके - नेते - संतोष तिडके - जालिंदर तिडके ( मा अध्यक्ष ) श्री अर्जुन मुंडे ( सेक्रेटरी ) दत्तत्रय तिडके - फौजी - संभाजी मुंडे - सचिन सुदे - जयद्रथ तिडके - सतिश तिडके - सदाशिव मुंडे - बाबुराव मुंडे - माणिक तिडके - पिंटु तिडके - सह - शाळेतील विद्यार्थी तथा संपूर्ण शिक्षक वृंध व नेते व नागरीक मोठ्या संख्येने या कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन मंत्री - पंकजा मुंडे यांना पुढील आयुष्य सुख समाधानी व भरभराटीचे जाऊन राज्याचे त्यांच्या हातुन चांगले कार्य घडो म्हणून सर्वांनी शुभेच्छा दिल्या

----------------------------------------

आंतरराष्ट्रीय महाकुंभला उपस्थित राहावे असे आव्हान केले. या दौ-यात त्यांच्यासोबत अखिल भारतीय माहेश्वरी महासभेचे संयुक्त मंत्री श्री. जुगलकिशोरजी लोहिया, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे संयुक्त मंत्री श्री नंदकिशोर तोतला, प्रदेश जनसंपर्क मंत्री ओमप्रकाशजी तापडिया, मंत्री सत्यनारायणजी सारडा हे पदाधिकारी सुद्धा आले होते. या कार्यक्रमास बीड जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष ॲड. श्रीकृष्ण तोष्णीवाल, जिल्हा सचिव जगदीश जाजू, युवा जिल्हाध्यक्ष रोहन मुंदडा, महिला अध्यक्ष शिवकन्या रांदड, पुनम जाजू, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोरजी मुंदडा, युवा अध्यक्ष किरण भन्साळी, प्रीतम तापडिया, पुनम भन्साळी, ललित बजाज, संतोष भंडारी, कांतीलाल चोकडा, विजय नावंदर, गुलाब सारडा, रामानुज मुंदडा, दत्तप्रसाद लोहिया यांच्यासह माहेश्वरी समाजातील युवक, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतीश तोष्णीवाल तर संचलन अमित रांदड यांनी केले. उपस्थितांचे आभार विजय नावंदर यांनी मानले.

------------------------------

चे राज्य समन्वयक श्री.प्रमोद शिंदे तसेच जिल्हा प्रशिक्षक श्री.उत्तम गायकवाड यांनी सखोल असे मार्गदर्शन करून मोहीम कशी राबवायची याचे नियोजन केले.कार्यक्रमाला उपसरपंच श्री अफरोज मणियार,श्री.विकास मोरे, ग्रा.पं.सदस्य सौ.पार्वतीबाई जोगदंड,श्री.लतीफ खुरेशी .गज्जु पटेल,वै.अधिकारी डॉ.अभिजीत अंजान,सर्व जि.प.शाळा तसेच खाजगी शाळांचे मुख्याध्यापक,ग्रा. वि.अधिकारी श्री. खामकर,उमेद प्रभागसमन्वयक माळी सर,ANM , सर्व आशाकार्यकर्त्या, अंगणवाडी कार्यकर्त्या,ग्रामसंघ अध्यक्ष व सचिव,सर्व CRP,VHNC समितीचे सदस्य उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी श्री.सचिन पांचाळ,शेख इर्शाद,गुलाब जोगदंड,खंडु जोगदंड,नितीन मोरे,नितीन चिंचोळे,राजेंद्र सुडके,उषाबाई,सुमनबाई यांनी परिश्रम घेतले.दरम्यान 30वर्ष अंगणवाडी कार्यकर्त्या म्हणुन सेवा देऊन कार्यनिवृत्त झालेल्या काजी मॅडम यांचा शाल,श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.सरपंच सौ.अनिता विकास मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम यशस्वी पणे पार पडला.

हॅलो बीड
# संघर्षनेता
रविवार दि. 27 जुलै 2025

## सरस्वती विद्यालयाची भव्य दिव्य इमारत उभारण्यासाठी ना. पंकजाताई यांच्याकडे पाठपुरावा करणार - प्रा. पवन मुंडे

**➲ ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सरस्वती विद्यालयात गणवेश आणि शालेय साहित्याचे वाटप**




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) ज्या शाळेत ना. पंकजाताई मुंडे यांचे शिक्षण झाले आहे त्या सरस्वती विद्यालयाची इमारत भव्य दिव्य करण्यासाठी आपण पंकजाताई यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी सांगितले. यावेळी वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष विनोद सामत यांची प्रमुख उपस्थिती होती.

पर्यावरण हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी "माझा वाढदिवस समाजोपयोगी कार्यक्रमांनी साजरा करावा, बॅनर-पोस्टरबाजी करु नये" असे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी ज्या शाळेत ना. पंकजाताई मुंडे यांचे शिक्षण झाले त्या शाळेत गरजू विद्यार्थ्यांना गणवेश आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष विनोद सामत होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नीळकंठ चाटे, वैद्यनाथ बँकेचे संचालक महेश निर्मळे, अनिल तांदळे, सारांश अर्बन बँकेचे अध्यक्ष नरसिंग सिरसाट, दै. महाराष्ट्र प्रतिमाचे संपादक ज्ञानोबा सुरवसे, युवक नेते किशोर केंद्रे, प्रशांत कराड, सचिन गिते, नितीन समशेट्टी, प्रितेश तोतला, आदी उपस्थित होते.

प्रारंभी श्री सरस्वती विद्यालय पान 3 वर

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आज पत्रकार विलास बडे यांचे व्याख्यान

**» युवक, युवती व नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे- प्रा. पवन मुंडे**



परळी वैजनाथ


राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या रविवार दि. 27 जुलै रोजी परळीत प्रसिद्ध वक्ते, आयबीएन लोकमतचे सहाय्यक संपादक विलास बडे यांच्या व्याखानाचे आयोजन करण्यात आले आहे. तरूणांना मार्गदर्शक ठरणाऱ्या व्याखानाला युवक, युवती आणि नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक, माजी नगरसेवक प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे सकाळी 11 वाजता पत्रकार विलास



बडे यांच्या व्याख्यान होणार आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने पान 3 वर

## श्रावण महिन्यात स्थानिकांसाठी विशेष दर्शनाची सोय व्हावी वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टकडे अँड. मनोज संकाये यांची मागणी



परळी वैजनाथ प्रतिनिधी –श्रावण महिना हा भक्तांसाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा असतो. या महिन्यात देशभरातून लाखो भाविक परळी वैजनाथ येथे भगवान वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येतात. मात्र, स्थानिक नागरिकांना या गर्दीतून दर्शन घेणे अनेकदा कठीण होते. त्यामुळे स्थानिकांसाठी वेगळी व विशेष दर्शनाची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टकडे केली आहे.

सध्या श्रावण महिन्यात दररोज हजारो भाविक मंदिरात दर्शनासाठी येत असून, रांगा काही वेळा मंदिराच्या बाहेर रस्त्यांपर्यंत वाढतात. अशा परिस्थितीत परळीतील ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, नोकरदार वर्ग महिलावर्ग, आणि शालेय विद्यार्थ्यांना नियमितपणे दर्शन घेणे अवघड होते.

त्यांनी देवस्थान ट्रस्टकडे विनंती केली आहे की, दररोज ठरावीक वेळेसाठी स्थानिक रहिवाशांसाठी स्वतंत्र रांगा किंवा विशेष दर्शन पासची सुविधा करण्यात यावी. यामुळे स्थानिक नागरिकांना त्रास न होता भक्तीभावाने दर्शन घेता येईल.देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी यावर सकारात्मक विचार करून लवकरच सकारात्मक निर्णय घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.स्थानिक भाविकांचे मत आहे की, अशी सुविधा पान 3 वर

## ना.पंकजाताई मुंडे हे नाव महाराष्ट्राच्या राजकारणात खंबीर आणि झुंजार नेतृत्वाचं प्रतीक – संजय आंधळे

**➲ वडवणीत शैक्षणिक,पर्यावरण सप्ताहाने मंत्री पंकजा मुंडेंचा वाढदिवस साजरा**





**वडवणी (सतिश मुजमुले) :**

राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे हे नाव केवळ राजकारणापुरतं मर्यादित नाही, तर ते एक प्रेरणादायी नेतृत्व, संघर्षशील विचारसरणी आणि समाजकार्याच्या भक्कम आधाराचा प्रतीक आहे. त्यांचा वाढदिवस उपक्रमशीलतेने साजरा होणं, ही त्यांच्या कार्याचीच पुढची पायरी असल्याचे मत वडवणी तालुका भाजपचे नेते संजय आंधळे यांनी शैक्षणिक व पर्यावरण सप्ताहाच्या प्रारंभ प्रसंगी मत व्यक्त केले

भारतीय जनता पक्षाच्या नेत्या आणि राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी तालुक्यातील चिंचोटी, हरिश्चंद्र पिंपरी, हरिश्चंद्र पिंपरी तांडा, सोन्नाखोटा, खाडेवाडी, डोंगरेवाडी, जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण व शैक्षणिक साहित्य वाटप करून वाढदिवस सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. पुढील सात दिवस शैक्षणिक, पर्यावरण पान 3 वर

## पंकजाताईच्या वाढदिवसाच्या निमित्त वृक्ष लागवडीचा उपक्रम कौतुकस्पद- राजेश गित्ते

**» ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेलू (परळी वैजनाथ) ग्रामपंचायतच्या वतीने वृक्षरोपण**



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावशाली आणि करारी नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवसाच्या निमित्त सेलू (परळी वैजनाथ) ग्रामपंचायतच्या सरपंच सौ.शिवकन्या रामचंद्र (बाळू) फड व युवा नेते रामचंद्र (बाळू) फड यांच्या वतीने वृक्षलागवड कार्यमाचे आयोजन करण्यात आले. वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ भाजप तालुकाध्यक्ष राजेश गित्ते यांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड करुन करण्यात आला. पंकजाताईच्या वाढदिवसाच्या निमित्ताने वृक्ष लागवडीच्या माध्यमातून सर्वच नागरिकांना पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी एक मोठा संदेश देण्यात आला आहे. पान 3 वर

## महेश सिनीयर सिटीझन ग्रुपच्या वतीने एकदिवसीय सहलीचे आयोजन



परळी वै प्रतिनिधी :- . श्रावण महिन्याचे औचित्य साधून महेश सिनीयर सिटीझन ग्रुपच्या वतीने कपीलधार-मांजरसुंबा जि. बीड येथील महान संत श्री मन्मथ स्वामी महाराज आणि चाकरवाडी येथील थोर संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या दर्शनासाठी एकदिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

जेष्ठ नागरिकांसाठी आपल्या निवृत्तीच्या काळात एक विरंगुळा म्हणून या ग्रुप ची श्री पांडुरंग सोनी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना केली. ग्रुपचा प्रमुख उद्देश म्हणजे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रात काम करत राहणे, तसेच सर्व पान 3 वर

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त संजय मुंडेंच्या पुढाकारातून टोकवाडीत पशुरोग उपचार व लसीकरण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद




महाराष्ट्राच्या रणरागिणी वंचित उपेक्षितांच्या कैवारी गोरगरिबबांचा आधार लोकनेत्या ना.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी तालुक्यातील टोकवाडी पंचायत समिती गणात

परळी वैजनाथ, (प्रतिनिधी) :- राज्याच्या पर्यावरण, पशुसंवर्धन, वातावरणीय बदल व दुग्धविकास मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री लोकनेत्या ना.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार, दि. 26 जुलै 2025 रोजी टोकवाडी पंचायत समिती गणात आयोजित करण्यात आलेले पशुरोग उपचार व लसीकरण शिबिर उत्साहात व यशस्वीरित्या पार पडले. या शिबिरात टोकवाडी व पंचक्रोशीतील गावांतील पशुपालकांनी सहभाग घेतला.

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, पशुसंवर्धन व वातावरणीय बदल व दुग्धविकास मंत्री, पालकमंत्री जालना, विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त शनिवार दि. 26 जुलै रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग मैदान व नवीन जिल्हा परिषद टोकवाडी येथे टोकवाडी पंचायत समिती गणातील सर्व गावातील पान 3 वर

## कारगिल विजय दिवस उत्साहात संपन्न



तहसीलदार परळी वैजनाथ यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेला हार घालून कारगिल युद्धात शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करून मोठ्या

परळी (प्रतिनिधी)कारगिल विजय दिवस थाटामाटा साजरा आज सकाळी 09:30 वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक परळी वैजनाथ येथे 26 वा कारगिल विजय दिवस मा श्री व्यंकटेश मुंडे साहेब, थाटात साजरा करण्यात आला.

सदरच्या कार्यक्रमात माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री संजीवन रघुनाथराव आघाव, परळी तालुक्याचे अध्यक्ष श्री भरत जनार्दनराव गीते, श्री पान 3 वर

## महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेची जिल्हा आढावा बैठक उत्साहात संपन्न

**➲ विविध तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या**




परळी वैजनाथ दि.26 (प्रतिनिधी)येथे महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने जिल्हा आढावा बैठकीचे आयोजन गुरुवारी (दि.24) सकाळी 9 वाजता करण्यात आले होते . या बैठकीस शहरासह जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी मोठी उपस्थिती होती. या बैठकीत संघटनेच्या विविध तालुक्यातील नियुक्त्या करण्यात आला.

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने येथील श्री.शनी मंदिराच्या सभागृहात गुरुवारी जिल्हा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे महासचिव डॉ भूषण कर्डिले, (नाशिक), राज्य कोषाध्यक्ष गजानन शेलार, पान 3 वर

## इनरव्हील क्लब परळी वैजनाथच्या अध्यक्षा श्रद्धा नरेश हालगे यांना 'बेस्ट प्रेसिडेंट' पुरस्कार

**पुणे अधिवेशनात कार्याचे कौतुक; सामाजिक क्षेत्रातील योगदानाची दखल**




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) इनरव्हील क्लब ऑफ परळी वैजनाथच्या अध्यक्षा श्रीमती श्रद्धा नरेश हालगे यांना पुणे येथे पार पडलेल्या 41 व्या डिस्ट्रिक्ट असेंब्ली अधिवेशनात 'बेस्ट प्रेसिडेंट' ट्रॉफीने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र, असोसिएशन ट्रॉफी आणि विशेष भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले.

या अधिवेशनाला उद्योजक रांका, माजी चेअरमन शोभना पालेकर, डिस्ट्रिक्ट चेअरमन आशा देशपांडे (25-26), नेत्रा बकड, स्मिता चाकोते, असोसिएशन चेअरमन आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

श्रद्धा हालगे गेल्या 15 पान 3 वर

## मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त भोगलवाडी येथे नेते तुकाराम ( बापु ) तिडके यांच्या नेतृत्वात विविध उपक्रम

**विद्यार्थ्यांना ड्रेस, खाऊ,वह्या पुस्तके व पेनचे वाटप करत केले वृक्षारोपण**



भोगलवाडी ( बाबुराव तिडके ) भोगलवाडी या गावचे लोकप्रिय उप - सरपंच तथा भाजपा नेते मा तुकारामजी तिडके यांच्या अध्यक्षतेखाली जि प प्रा माध्यामिक शाळा भोगलवाडी येथिल विद्यार्थ्यांना ड्रेस वह्या पुस्तके पेन खाऊचे वाटप व वृक्षारोपन ना पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन स्तुत्य उपक्रम राबविला गेल्या चाळीस वर्षापासून श्री तुकाराम ( बापु ) यांचे घराणे लोकनेत्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या घराण्याशी कटीबद्ध व निष्ठावंत आहे हा सामाजिक उपक्रम राबविला असता उप - सरपंच श्री तुकाराम तिडके यांचे कार्यक्रमाला जमलेल्या नागरिकांतून अभिनंदन करण्यात आले या मंत्री - पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त धुमधडाक्यात पान 3 वर

## महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे अध्यक्ष मधुसूदन गांधी यांचा अंबाजोगाई दौरा संपन्न



अ ं ब ा ज ो ग ा ई प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे अध्यक्ष मधुसूदन गांधी यांनी अंबाजोगाई येथे दि.25 जुलै रोजी भेट देवून माहेश्वरी समाजातील लोकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी ढालेगाव येथे महिलांसाठी होणा-या नवचेतना शिबीरात महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान केले.

येथील राजस्थानी मंगल कार्यालयात हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात महेश वंदनाने झाली. यावेळी संवाद साधताना मधुसूदन गांधी यांनी युवकांसाठी डिसेंबर मध्ये एमटीएफ हे व्यापारी प्रदर्शन छत्रपती संभाजी नगर मध्ये आहे, त्यात येऊन आपला व्यापार वाढवावा असे सांगितले. तसेच येत्या ऑगस्ट महिन्यात समाजातील महिलांसाठी होणा-या नवचेतना शिबीरात महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, समाजातील प्रत्येक घटकांनी जोधपुर पान 3 वर

## बीड जिल्ह्यातील बर्दापुर होणार 'अनेमिया मुक्त गाव'. नियोजन बैठकीचे आयोजन



प्रतिनिधी.ईनामदार बर्दापुर

पंचायत राज भारत सरकार,महाराष्ट्र शासन आणि यशदा पुणे यांच्यामार्फत जिल्ह्यातील एकमेव बर्दापुर या गावाची आदर्श महिलास्नेही व बालिकास्नेही गाव बनविण्यासाठी निवड करण्यात आली आहे. त्या अंतर्गत यशदा पुणे,सहाय्यक ट्रस्ट मुंबई व ग्रामपंचायत बर्दापुर यांच्या संयुक्त विद्यमानाने गावात 'अनेमिया मुक्त गाव' ही मोहीम राबविण्यात येणार आहे. आज दि.25जुलै शुक्रवार रोजी या संबंधीची नियोजन बैठक यशस्वीरित्या पार पडली. यशदा पुणे आणि सहाय्यक ट्रस्ट मुंबई पान 3 वर